पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९०५ /२०२३ दि. २५ /०७/२०२३

## ''वाहतूक नियंत्रण अधिसुचना''

**ज्याअर्थी,** ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात ठाणे वाहतूक विभाग अंतर्गत कोपरी वाहतूक उप विभागाच्या हद्दीत ठाणे महानगरपालिका तर्फे ठाणे स्मार्ट सिटी लि. कंपनी कडून ठाणे रेल्वे स्टेशन पूर्व येथील ICICI बँक सिध्दार्थनगर ते विराज टॉवर दरम्यान वळण रस्त्यावर दोन स्पॅन P12-P13 ते P13-P14 या पिलरवर सेगमेंट ठेवण्याचे काम दि. २६/०७/२०२३ ते दि. २४/०८/२०२३ रोजीपावेतो करण्यात येणार आहे.

ठाणे पूर्व–कोपरी सर्कल ते ठाणे रेल्वे स्टेशन पूर्व या येणाऱ्या व जाणाऱ्या वाहिनीवर मोठया प्रमाणा वाहनांची वर्दळ होत असते. पिलरवर सेगमेंट ठेवण्याचे काम करते वेळी सिध्दार्थनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते कोपरी सर्कल दरम्यान दोन्ही वाहिनीवरील वाहतूक पूर्णपणे बंद ठेवून पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये तसेच वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** १) मुंबई कडून आनंदनगर चेकनाका सर्व्हिस रोड कडून ठाणे रेल्वे स्टेशन पूर्व कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **कोपरी सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने फॉरेस्ट नाका – ठाणेकरवाडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) तीन हात नाका व टेलिफोन नाका कडून भास्कर कट मार्गे कोपरी सर्कल येथून ठाणे रेल्वे स्टेशन पूर्व कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **कोपरी सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने कोपरी सर्कल येथून उजवे वळण घेवून फॉरेस्ट नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) ठाणे रेल्वे स्टेशन पूर्व सिध्दार्थनगर मार्गे कोपरी सर्कल कडे जाणाऱ्या हलक्या वाहनांना **सिध्दार्थनगर डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने हसिजा कॉर्नर – भाजी मार्केट – ठाणेकरवाडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) ठाणे रेल्वे स्टेशन पूर्व सिध्दार्थनगर मार्गे कोपरी सर्कल कडे जाणाऱ्या जड – अवजड वाहनांना **सिध्दार्थनगर डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने मंगला हायस्कुल – जुने कोपरी पोलीस स्टेशन – कन्हैयानगर – ठाणेकरवाडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसुचना दि. २६/०७/२०२३ रोजी रात्रौ २३:०० वा. ते दि. २४/०८/२०२३ रोजी सकाळी ०६:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना राजपत्रात प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

CamScanner

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उप विभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner